महाराष्ट्र शासन

शासन परवानगी आदेश

क: इंमाशा २०१२/(११२/१२ )/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक: २९ डिसेंबर, २०१२

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे

**विषय:**- इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस इ.८ वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग जोडून कायम विना अनुदान तत्वावर सूरु करण्यास परवानगी देण्याबाबत

**संदर्भ:**- १) शासन निर्णय, क्र.नमाशा २०१०/(९६/२०१०)/माशि-१, दि.१०.०३.२०१०
२) शासन निर्णय, क्र.नमाशा २०१०/(९६/२०१०)/माशि-१, दि.१४.१०.२०१०
३) संस्थेचा **दि.२३/०७/२०१२** चा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे

महोदय,

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ, घोडेगाव, जि.पुणे** या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वी पर्यंत सुरु असलेल्या **न्यू इंग्लिश स्कूल, घोडेगाव जि.पुणे** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ.८ वी ते इ.१० वी चे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे:-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्राकरिता (प्रथम प्रोव्हिजनल व नंतर रेग्यलुर) अर्ज करणे आवश्यक राहील.

२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणा-या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) आवश्यक असणा-या सर्व निकषांची पूर्तता करणाच्या अधीन राहतील.

३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.

४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणा-या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

६) परवानगी देण्यात आलेल्या इ.८ वी ते इ.१० वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमि[illegible] उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकवणे आवश्यक राहील.

७) "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम-२००९" नुसार प्राथमि[illegible] शिक्षण इयत्ता १ ली ते ८ वी असे आहे. सदर अधिनियमातील प्रकरण ४ मधील अनुच्छेद १८ व १९ मधील शाळा मान्यतेबाबतच्या तरतुदींचे पालन संबंधित शाळांनी करणे आवश्यक राहील.

८) परवानगी आदेशाच्या वेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(सु.न.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१ शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२ मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव / मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
३ विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग / शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
४ सचिव, आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ, घोडेगाव, जि.पुणे
५. निवड नस्ती/माशि-१

Scanned with OKEN Scanner

कायम विना अनुदान

प्रा.शि.प्रा.प्रशा-२/आप्राशी/मान्यता/पुणे ६३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 15 JUL 2003

2

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी). . .

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक व्हीएसएल- १००३/(५०९/२००३)/प्राशि-१, दिनांक २४ जून, २००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | आंबेगांव तालुका विद्याविकास मंडळ, घोडेगांव, ता. आंबेगांव, जि. पुणे. | जनता विद्यामंदीर, न्यू इंग्लिश स्कूल, पुणे | इंग्रजी |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या नॉनज्युडिशियल मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व त्याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता )

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत माहितीसाठ अग्रेषित सादर.

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव, आंबेगांव तालुका विद्याविकास मंडळ, घोडेगांव, ता. आंबेगांव, जि. पुणे.

Scanned with OKEN Scanner